# ॲकॅडमिक कौन्सिल घेणार परीक्षेचा निर्णय

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील कॉलेजमधील पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षातील परीक्षेबाबतचा निर्णय ॲकॅडमिक कौन्सिलच्या बुधवारी (ता. २७) होणाऱ्या बैठकीत होणार आहे. दरम्यान, विद्यापीठ अनुदान आयोग व राज्य सरकार नियुक्त समितीने यापूर्वीच अंतिम वर्षाची परीक्षा एक ते ३१ जुलै या कालावधीत घेण्याच्या शिफारसी केल्या आहेत. त्यानुसार विद्यापीठातील परीक्षा विभागाचे काम सुरू आहे. मात्र, अंतिम निर्णय ॲकॅडमिक कौन्सिलचा असणार आहे.

विद्यापीठाच्या परीक्षेसंदर्भातील धोरण ठरविण्यात ॲकॅडमिक कौन्सिलच्या भूमिकेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यामुळे बुधवारी होणाऱ्या बैठकीत परीक्षेबाबत नेमका काय निर्णय होतो याकडे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कॉलेजिअन्सचे लक्ष लागले आहे. दुसरीकडे विद्यापीठ प्रशासन, विद्यापीठ अनुदान आयोगाकडून परीक्षेकडून काय शिफारशी होतात याकडे लक्ष ठेवून आहे. उच्च शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी अंतिम वर्षाची परीक्षा रद्द करण्यासंदर्भात यूजीसीकडे केलेल्या शिफारसीवरून नव्या वादाला तोंड फुटले आहे. उच्च शिक्षण क्षेत्रातील जाणकार व तज्ज्ञांनी अंतिम वर्षाच्या अभ्यासक्रमाची परीक्षा रितसर घेऊन विद्यार्थ्यांचा निकाल जाहीर करावा, अशी मते मांडली आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर यूजीसी काय निर्णय घेते, विद्यापीठांना काय शिफारशी करते याकडे लक्ष लागू राहिले आहे.

दरम्यान, यावर्षी पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम आणि द्वितीय वर्षाची परीक्षा रद्द करण्यात आली आहे. अद्याप अंतिम वर्षातील अभ्यासक्रमाच्या परीक्षेसंदर्भात निर्णय झाला नाही. अंतिम वर्षाच्या परीक्षेवरून मतमतांतरे सुरू आहेत. यामुळे कौन्सिल काय निर्णय घेते यावर परीक्षेचे भवितव्य ठरणार आहे.